**महत्वाचे**

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/२४/३४/३५४/२०२५ दिनांक २९/०७/२०२५

# पोलीस महासंचालक यांचे स्थायी आदेश क्र. ०२/२०२५

***

नुकतीच मा. उच्च न्यायालयाने क्रिमिनिल रिट पिटीशन नं. ४७२९/२०२१ या संदर्भात बेकायदेशीररीत्या बसवलेल्या लाऊड स्पीकर इत्यादी मुळे होणाऱ्या ध्वनी प्रदुषणाबाबत कायद्याच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. या विषयात या कार्यालयाकडून याआधी अनेक आदेश तसेच परिपत्रके निर्गमित करण्यात आली आहेत. मात्र विविध घटकांमध्ये अजूनही मोठ्या संख्येने बेकायदेशीर लाऊड स्पीकर तसेच परवानगी घेऊन लावण्यात आलेले लाऊड स्पीकरद्वारे ध्वनीप्रदुषण नियमाचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये असे बेकायदेशीर तसेच परवानगी असलेले मात्र नियमाचा भंग करणारे लाऊड स्पीकर विरुध्द कारवाई करणे अपेक्षित आहे.

यासाठी सोबत जोडलेले Annexure - I आणि Annexure - II अन्वये सर्व घटक प्रमुखांनी त्यांच्या हद्दीतील विनापरवानगी तसेच ध्वनी प्रदुषण नियमांचे उल्लंघन करणारे सर्व लाऊड स्पीकर विरुध्द कारवाई करावयाची आहे. तसेच, या संदर्भात सर्व घटकांनी त्यांचा मासिक अहवाल प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना पाठवावयाचा आहे.

(रश्मि शुक्ला)
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
सर्व पोलीस अधीक्षक

प्रत सादर :-

अपर मुख्य सचिव (गृह विभाग), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

प्रत सस्नेह :-

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.

कुठल्याही व्यक्तीद्वारे अनाधिकृत लाऊड स्पीकर किंवा कुठल्याही लाऊड स्पीकर मुळे होणाऱ्या ध्वनी प्रदुषणाची तक्रार आल्यानंतर संबंधित पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी किंवा त्यांच्या आदेशान्वये पोलीस उप निरीक्षक पेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी हे ध्वनी मापक यंत्र (Noise Level Meter) सोबत घेऊन संबंधित घटना स्थळी भेट देतील. तेथे दोन पंचाच्या समक्ष ध्वनी मापक यंत्राद्वारे (Noise Level Meter) होणाऱ्या ध्वनीची पातळी ही डेसिबल मध्ये मोजतील. ध्वनी मापक यंत्राद्वारे निघणाऱ्या प्रिंटवर दोन्ही पंचाच्या स्वाक्षऱ्या घेतल्या जातील. तसेच भेट देणारा पोलीस अधिकारी सुध्दा स्वत:चे नाव, हुद्दा, दिनांकासहीत स्वाक्षरी आणि वेळ याची नोंद करेल. त्यानंतर सदरचे अधिकारी पंचनामा तयार करुन त्यामध्ये  लाऊड स्पीकर लागलेल्या ठिकाणाची संपूर्ण माहिती जसे की, सदरच्या वास्तुचा सविस्तर पत्ता, सदरची वास्तु कोणाची आहे (जमिनीचा मालक) तसेच अशी वास्तू ही धार्मिक स्थळ असल्यास त्याची नोंद (Registration) आहे अगर कसे? , कार्यकारी मंडळातील सदस्यांचे नावे, अध्यक्षाचे नाव इ. बाबतची नोंद पंचनाम्यात करतील. त्याचप्रमाणे ध्वनी मापक यंत्रामधून मोजणी झाल्यानंतर ध्वनीची पातळी किती डेसिबल होती याचा पण उल्लेख करतील. यासोबतच सदर वास्तू असलेले ठिकाण हे निवासी, व्यावसायिक, औद्यगिक किंवा शांतता क्षेत्र आहे याचासुध्दा उल्लेख करतील. स्थानिक संस्थानी अशाप्रकारची झोनिंग केलेली नसल्यास दोन्ही पंचाच्या मदतीने सदरची वास्तू असलेल्या ठिकाणाचा बहुतांश भाग हा निवासी / व्यावसायिक / औद्यगिक किंवा शांतता क्षेत्र आहे, याबाबतची स्पष्ट नोंद घ्यावी. ध्वनी प्रदुषण (विनियमन व नियंत्रण) नियम, २००० चे परिशिष्ट (Rule ३ (१) and Rule ४ (१)) अन्वये मध्ये नमूद केल्याप्रमाणे दिवस म्हणजे सकाळी ६.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत व रात्र म्हणजे रात्री १०.०० ते सकाळचे ०६.०० वाजेपर्यंत असे समजण्यात यावे. त्याचप्रमाणे ध्वनीच्या संदर्भात Ambient Air Quality Standards नुसार डेसिबलची मर्यादेबाबतचा क्षेत्र निहाय तक्ता खालीलप्रमाणे नमूद असून, सदर क्षेत्रानूसार ध्वनी प्रदुषणाची पातळी ही मर्यादापेक्षा जास्त असल्यास त्याचा स्पष्ट उल्लेख पंचनाम्यात करतील.

**Ambient Air Quality Standards in Respect of Noise ***

| Area Code | Category of Area / Zone | Limits in dB | |
|---|---|---|---|
| | | Day Time | Night Time |
| A | Industrial area | 75 | 70 |
| B | Commercial area | 65 | 55 |
| C | Residential area | 55 | 45 |
| D | Silence Zone | 50 | 40 |

* ध्वनी प्रदुषण (विनियमन व नियंत्रण) नियम, २००० चे नियम ५ (४) अन्वये सार्वजनिक ठिकाणी त्या ठिकाणाच्या सीमेवरची ध्वनी पातळी त्या क्षेत्रासाठी निर्धारित मर्यादेपेक्षा १० डेसिबल (A) ने अधिक किंवा ७५ डेसिबल (A), जे यापैकी जे कमी असेल, पेक्षा जास्त नसावी. तसेच नियम ५ (५) अन्वये खाजगी मालकीच्या बाबतीत त्या खाजगी जागेच्या सीमेवरची ध्वनी पातळी त्या क्षेत्रासाठी निर्धारित मर्यादेपक्षा ५ डेसिबल (A) ने अधिक नसावी.

०२. अशा पध्दतीने ध्वनी प्रदुषणांची पातळी मोजून व पंचनामा केल्यानंतर पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी हे आपला अहवाल कलम ३८, महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये घटकातील पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षकांना पाठवतील. त्याचप्रमाणे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी आपल्या अहवालाची एक प्रत प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ यांना सुध्दा पाठवतील. असे अहवाल प्राप्त झाल्यानंतर पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांनी करावयाची कारवाई ही Annexure -II मध्ये दर्शविण्यात आली आहे.

०३. महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३८ अन्वये प्रभारी अधिकाऱ्याचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक हे कारवाई करतीलच मात्र सदर अहवालाची एक प्रत पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी हे महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांना सुध्दा पाठवतील. मा. उच्च न्यायालयाने आदेशीत केल्याप्रमाणे पहिल्यावेळी चेतावणी दिल्यानंतर सुध्दा जर आदेशाचा भंग होत असेल तर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३६ नुसार फिर्याद दाखल करतील. महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ७० मध्ये पोलीसांना अशा प्रसंगी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३८ चे आदेश न मानणाऱ्यास किंवा त्याचा विरोध करणाऱ्यास अटक करण्याचे अधिकार देण्यात आले आहे. मात्र असे झाल्यास महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) हे पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ तसेच ध्वनी प्रदुषण (विनियमन व नियंत्रण) नियम, २००० अन्वये संबंधित न्यायालयाला "तक्रार" (Complaint) सुध्दा दाखल करु शकेल. संबंधित तक्रारीवर न्यायालय कलम २२३ BNSS अन्वये पुढील कारवाई करु शकेल. अशा पध्दतीने वारंवार नियमाचा भंग करणाऱ्या विरुध्द कलम १३६ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये पोलीस खात्यामार्फत तर ध्वनी प्रदुषण (विनियमन व नियंत्रण) नियम, २००० अन्वये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत (MPCB) अशी, दोन्ही खात्यामार्फत कारवाई करता येईल. नंतर मात्र न्यायालय दोन्ही कायद्याअंतर्गत प्राप्त झालेले प्रकरण एकत्रित करुन खटला चालवू शकेल. अशी कारवाई केल्यास संबंधितांवर पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये १ लाख रुपयाचा दंड व ५ वर्षापर्यंतचा कारावास तर कलम १३६ महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये ३ महिन्यापर्यंतचा कारावास व ५ हजार रुपयापर्यंतचा दंड न्यायालय ठोठावू शकेल.

०४.	त्याचप्रमाणे कलम १४९ महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये पोलीसांना, कलम ७० महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये दिलेले कुठलेही आदेश मानण्यास विरोध करणारा किंवा त्याची अंमलबजावणी न करणाऱ्या व्यक्तीच्या विरुध्द वेगळी फिर्याद दाखल करता येईल. ज्यामध्ये दोषसिध्दी झाल्यास ४ महिने ते एक वर्षापर्यंत कारावास आणि आर्थिक दंडाची तरतूद आहे. याचाच अर्थ कलम ७० अन्वये पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षक यांनी कलम ३८ चा भंग करणाऱ्या विरुध्द अटक किंवा लाऊड स्पीकर इत्यादींची जप्तीचे आदेश दिल्यास त्याचा विरोध किंवा पालन करण्यास नकार देण्याऱ्या व्यक्ती विरुध्द कलम १४९ महाराष्ट्र पोलीस कायद्याअन्वये वेगळी फिर्याद दाखल करता येईल.

०५.	पहिल्यांदा उल्लंघन झाल्यानंतर मा. उच्च न्यायालयाने आदेशीत केल्याप्रमाणे सुरुवातीला कलम ३८ अन्वये ताकीद (Warning) देता येईल. मात्र फेर उल्लंघन झाल्यास कलम १३६ महाराष्ट्र पोलीस कायदा प्रमाणे गुन्हे दाखल झाल्यानंतर लाऊड स्पीकर इत्यादींची जप्ती तसेच तपास करुन न्यायालयात चार्जशिट पाठवावी.

०६.	या विषयावर करावयाची सविस्तर कार्यवाही Annexure -II मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

**Annexure - II**

## लाऊड स्पीकर इ. द्वारे ध्वनी प्रदुषणावर नियंत्रणासाठी करावयाच्या कारवाईचा तक्ता

पोलीस ठाण्यात तक्रार प्राप्त झाली

↓

पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी हे घटनास्थळी जातील.

↓

ध्वनी मापक यंत्राद्वारे आवाजाची पातळी मोजतील.

↓

दोन साक्षीदारांच्या उपस्थित पंचनामा तयार करतील.

↓

आवाजाच्या पातळीचे उल्लंघन आढळल्यास

जर उल्लंघन आढळले नाही तर तक्रार दप्तरी दाखल (file) करतील.

↓

अहवाल पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षकांना पाठवतील.

अहवालाची एक प्रत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाला पाठवतील.

↓

- पो.आ./पो. अ. हे कलम ३८ महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये चेतावणीसह कारणे दाखवा नोटीस जारी करतील.

↓

- प्रकरणाचा निपटरा होईपर्यंत अंतरिम आदेश जारी करु शकतील.

↓

- ०७ दिवसांच्या आत कारणे दाखवा नोटीसला उत्तर मागवून घेतील

↓

- पो.आ. / पो. अ. हे कलम ३८ महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये अंतिम आदेश जारी करतील.

↓

- असा आदेश जारी केल्यानंतर, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३८ (२) नुसार आक्षेप असल्यास ते ऐकून घेतील.

प्रभारी अधिकारी यांना पुन्हा त्याच जागेवरुन ध्वनीच्या नियमांचे उल्लंघन केल्याची तक्रार प्राप्त झाल्यावर घटनास्थळी पंचांच्या सोबत भेट देतील.

ध्वनीची पातळी मोजल्यानंतर आणि पंचनामा करुन त्याचा अहवाल पो.आ / पो.अ यांना पाठवतील.

पो.आ / पो.अ हे महाराष्ट्र पोलीस कायदा १३६ अन्वये गुन्ह्याची नोंद आणि तपास करण्याचे आदेश पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना देतील.

महाराष्ट्र पोलीस कायदा ७० अन्वये, अटक आणि उपकरणे जप्त करण्याचा अधिकारी आहे. कलम ७० अन्वये कोणत्याही निर्देशाचे पालन करण्यास नकार देणारी किंवा त्याचे पालन न करणारी व्यक्ती यांच्याविरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा, कलम १४९ अंतर्गत स्वतंत्र फिर्याद नोंदविली जाऊ शकते.

न्यायालयात सादर केलेल्या दोषारोप पत्राला महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३६ अन्वये रु. ५०००/- पर्यंतचा दंड आणि ०३ महिने कारावास. (तर कलम १४९ नुसार ४-१२ महिने कारावास आणि दंड)

परत उल्लंघन केल्याबाबतच्या अहवालाची प्रत प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाला देतील.

पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ आणि ध्वनी प्रदुषण (विनियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या तरतुदीखाली न्यायालयात BNSS कलम २२३ अंतर्गत तक्रार दाखल करु शकतील.

महाराष्ट्र पोलीस कायदा १३६ अन्वये असलेला खटला आणि पर्यावरण संरक्षण कायदा / ध्वनी प्रदुषण नियमाखाली महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्याकडील तक्रार (प्राप्त असल्यास) एकत्रित करुन, न्यायालय संयुक्त खटला चालवू शकेल.

- वरीलप्रमाणे कारवाई करण्यापूर्वी घटकांनी त्यांचे हद्दीत लावलेले सर्व लाऊड स्पीकर इ. ची माहिती घ्यावी. परवानगी घेऊन / विनापरवानगी किती लाऊड स्पीकर्स आहेत हे तपासण्यासाठी सर्वेक्षण करावे.
- ज्या लाऊड स्पीकरांना परवानगी आहे, त्यांनी ध्वनी प्रदुषण (विनियमन व नियंत्रण) नियम, २००० मध्ये नमूद केल्यानुसार आवाज पातळीचे पालन करणे आवश्यक आहे. आवाजाच्या पातळीचे उल्लंघन झाल्यास वर दिलेल्या प्रक्रियेनुसार कारवाई केली जावी.
- स्थानिक स्वराज्य संस्थेने निवासी / व्यावसायिक / औद्यगिक / शांतता इ. सारखे क्षेत्र घोषित केले नसतील तर पोलीस स्टेशनचे प्रभारी हे पंचनामा करताना उल्लंघन झालेले क्षेत्र हे बहुतांशी कोणत्या प्रकारचे आहे हे दोन साक्षीदारांच्या स्वाक्षरीने उल्लेख करतील. त्यानुसार ध्वनी प्रदुषण (नियंत्रण व विनियमन) नियम, २००० मध्ये नमूद केल्यानुसार आवाजाची पातळी तपासतील आणि त्याचा अहवाल देतील.
- जर कोणतेही धार्मिक किंवा इतर बांधकाम वादग्रस्त असल्यास, पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी तसेच पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांनी त्याचा उल्लेख फक्त "सदरची वास्तु "अमुक या ठिकाणी आहे अशा पध्दतीने करुन त्याबाबत सविस्तर माहिती स्पष्टपणे द्यावी. जेणेकरुन महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३८ अंतर्गत कारवाई ही सदर बांधकाम / वास्तूबाबत केली जाईल. तसेच, सदरचे बांधकाम / वास्तू हे अधिकृत किंवा अनाधिकृत आहे याकडे महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३८ अन्वये कारवाई करतांना लक्ष न देता पोलीस स्टेशनचे प्रभारी यांनी सदर वास्तुचे व्यवस्थापकाचा शोध घ्यावा व त्याबाबत पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना सादर करण्यात येणाऱ्या अहवालात व्यवस्थापकाचे नाव व पत्ता स्पष्टपणे नमूद करावा. जेणेकरुन कारणे दाखवा नोटीस व ताकीद / फिर्याद ही फक्त अशाच व्यक्तीला दिली जाईल / दाखल केली जाईल.
- लाऊड स्पीकर परवानगीसाठी अर्जावर प्रक्रिया करताना प्रचलित कायद्यानुसार अर्ज तपासावे व त्या व्यतिरिक्त पुढील दिल्याप्रमाणे काही मार्गदर्शक तत्त्वे विचारात घ्यावी.

  १. लाऊड स्पीकरची परवानगी मागण्यासाठी कोणताही अर्ज हा वैध कागदपत्रासह आला पाहिजे, जसे की जमिनीची मालकी, बांधकाम परवाना आणि स्थानिक संस्था यांचे ना-हरकत इ. तसेच पोलीस अधिकाऱ्यानी ही कागदपत्रे संबंधित विभागांकडे फेर तपासाणीसाठी पाठवली पाहिजेत. स्थानिक संस्था / विभाग यांच्याकडून या कागदपत्रांच्या सत्यता किंवा इतर बाबींचा पडताळणी अहवाल तातडीने मागवून घ्यावा.

  २. मर्यादित कालावधीचे विशिष्ट कार्यक्रम वगळता, कोणत्याही मोकळ्या जागेत / शासकीय / खाजगी इमारती, झाडे इ. वर लाऊड स्पीकर लावण्यासाठी परवानगी सहसा दिली जाऊ नये. कुठल्याही परिस्थितीत अशा ठिकाणांवर दिर्घ मुदतीसाठी लाऊड स्पीकरची परवानगी देण्यात येऊ नये.

३. लाऊड स्पीकरच्या परवानगीसाठी अर्ज करतांना, धार्मिक संस्थेच्या व्यवस्थापन समितीने लाऊड स्पीकर लावण्याचा ठराव अर्जासोबत जोडला असावा.

४. लाऊड स्पीकर लावण्याची परवानगी देताना ध्वनी प्रदुषण (विनियमन व नियंत्रण) नियम, २००० मधील तरतूदी स्पष्टपणे नमूद कराव्यात.

५. ध्वनी प्रदुषण (विनियमन व नियंत्रण) नियम, २००० मधील तरतुदी आणि स्थानिक पोलीसांनी दिलेल्या परवानगी पत्रातील सर्व नियम व अटी पालन करण्याचे शपथपत्र (Affidavit) अर्जदारांकडून घ्यावे.

६. कोणत्याही अनाधिकृत वास्तूला लाऊड स्पीकर लावण्याची परवानगी देऊ नये.

७. ज्या ठिकाणी लाऊड स्पीकर लावण्याची परवानगी मागण्यात आली आहे त्या ठिकाणी स्थानिक पोलीसांनी भेट देणे आवश्यक आहे. तसेच लाऊड स्पीकर लावण्याची परवानगी कोणत्या उद्देशाने मागितली आहे याची पडताळणी केली पाहिजे.

८. लाऊड स्पीकर लावण्याला परवानगी दिलेल्या किंवा नाकारण्यात आलेल्या सर्व ठिकाणी कायदे / नियम / परवानगीच्या अटी इ. चे पालन केले जात आहे का याची खात्री करण्यासाठी स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी नियमित आणि अचानक भेटी दिल्या पाहिजेत. कोणत्याही ठिकाणी विनापरवानगी किंवा ध्वनी पातळीचे नियमांचे पालन न करता लाऊड स्पीकर आढळल्यास वरीलप्रमाणे महाराष्ट्र पोलीस कायद्याअंतर्गत कारवाई करावी.

९. वरील सूचना ह्या मार्गदर्शनपर असून प्रचलित कायदे / नियम अनुसार पूर्ण पडताळणी करुनच लाऊड स्पीकर परवानगीचे अर्ज विचारात घ्यावे.

१०. कुठल्याही पोलीस स्टेशन हद्दीत अनाधिकृत भोंगे आढळून आल्यास त्या पोलीस स्टेशचा प्रभारी अधिकारी जबाबदार धरला जाईल.

११. पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक यांनी गरजेनुसार त्यांचे घटकात भरारी पथकाची स्थापना करावी. सदरचे भरारी पथक हे हद्दीतील अनाधिकृत भोंगे तसेच ध्वनी प्रदुषणावर लक्ष ठेवून संबंधित प्रभारी अधिकारी यांना माहिती पुरवतील.

• ध्वनी प्रदुषण होऊ नये यासाठी लोकांमध्ये जागृती होण्याच्या दृष्टीने ध्वनी प्रदुषणामुळे होणारे नुकसान तसेच ध्वनी प्रदुषण केल्यामुळे होणाऱ्या शिक्षेबाबत बॅनर्स तयार करुन संबंधित पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गृह निर्माण संस्था, औद्योगिक संस्था इ. ठिकाणी लावण्यात यावेत. तसेच ध्वनी प्रदुषणाबाबत जास्तीत जास्त लोकांना माहिती होण्यासाठी वृत्तपत्रात प्रसिध्दीसाठी देण्याबाबत स्थानिक स्तरावर माहिती व जनसंपर्क अधिकारी यांच्या मदतीने जागृती करण्याची कार्यवाही करावी.